# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६ ) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(परीक्षा व मुल्यमापन मंडळ)**

**एम.आय.डि.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली – ४४२६०५**

**E-mail:** director.boee@unigug.ac.in

जा.क्र./गोंवीग/पवमुमं/ २६२४ /२०२३ दिनांक: २६/१०/२०२३

## परिपत्रक

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांना कळविण्यात येते की, अनोळखी मोबाईल नंबरव्दारे AISHE Code साठी पैशांची मागणी करण्यासाठी येणाऱ्या Fake Call बाबत शिक्षण संचालक (उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र प्राप्त झाले आहे. त्याअनुसंगाने असे Call प्राप्त झाल्यास कुठलाही प्रतिसाद देऊ नये व महाविद्यालयांनी कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीस बळी पडु नये. करीता सर्व संबंधीतांनी याची नोंद घेउन असे Call प्राप्त झाल्यास त्याबाबत अवगत करण्यात यावे.

संचालक (प्र.)
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्र :– १) शिक्षण संचालक (उच्च शिक्षण ), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र

प्रतिलिपी :–

१) मा. कुलगुरू यांचे स्विय्य सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र. कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली DHEPN-STAT011/20/2023-STATS

I/140550/2023 3041 दि. 18/10/23

दि.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 9177 दि. 18/10/23

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
मध्यवर्ती इमारत, पुणे - 411 001
संकेतस्थळ:- www.dhepune.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

stat.dhepune@nic.in

020-29707093

दिनांक – 05.09.2023

क्र.उशिसं/सांख्यिकी/ AISHE/2023-24/

प्रति,

1.कुलसचिव,
सर्व विद्यापीठ,

2.AISHE नोडल अधिकारी,सर्व विद्यापीठे

**विषय :- अनोळखी मोबाईल नंबरव्दारे AISHE Code साठी पैशांची मागणी करण्यासाठी येणाऱ्या Fake Call बाबत.**

उपरोक्त विषयान्वये अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम, उच्चतर शिक्षा विभाग,शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत राबविण्यात येतो. तसेच नवीन महाविदयालयांना AISHE या पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

त्या अनुषंगाने नवीन महाविदयालय AISHE या पोर्टलवर नोंदणी करतात, पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर महाविदयालयास पाच अंकी Request Id प्राप्त होतो, त्यानंतर प्राप्त झालेल्या Request Id ला प्रथम आपल्या संलग्नित विद्यापीठाची ऑनलाईन (Approval) मान्यता असते, विद्यापीठाने महाविदयालयाने केलेली Online Request व्यवस्थित तपासून मान्य करुन पुढील कार्यवाहीसाठी स्टेट नोडल ऑफिसर (उच्च शिक्षण संचालनालय,पुणे) यांच्याकडे वर्ग करावे. तसेच महाविद्यालयास पुढील प्रक्रियेची माहिती देणे. नोंदणी प्रक्रिया ही पूर्णपणे विनाशुल्क आहे. या प्रक्रियेचे तीन टप्पे आहेत, 1. विद्यापीठाचे ऑनलाईन अप्रूवल 2.राज्य नोडल अधिकारी ऑनलाईन अप्रूवल व अंतिम 3.उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, नवी दिल्ली यांच्यामार्फत सदर महाविदयालयास केलेल्या ऑनलाईन विनंतीत दिलेल्या ई-मेल आयडीवर AISHE Code पाठविण्यात येतो किंवा त्रुटीअसल्यास नाकारण्यात येते. सदर महाविदयालयास नाकारण्यात आल्याचे कारणदेखील ई-मेलव्दारे पाठविण्यात येते. तसेच या तिन्ही टप्प्यात महाविदयालये यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे फी, टॅक्स, शुल्क स्वीकारले जात नाही.

परंतु काही महाविद्यालये यांना अनोळखी मोबाईल नंबरव्दारे संपर्क करुन AISHE Code साठी Google Pay / Phone Pay अन्य ऑनलाईन व्यवहारांव्दारे पैशांची मागणी करण्यात येत आहे. व पैसे दिल्यावरच AISHE Code दिला जाईल असे सांगण्यात येत आहे. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क नसल्याने, महाविदयालयांनी अशा कोणत्याही प्रकारच्या फसवणुकीस बळी पडू नये. अशा सूचना विद्यापीठ नोडल अधिकारी यांनी संलग्निकरण पत्र ( Affiliation Letter ) देतेवेळी आपल्या अंतर्गत असणाऱ्या नवीन महाविदयालयांना विद्यापीठ स्तरावरुन कळविण्यात यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 13-10-2023 17:25:49

**डॉ.शैलेंद्र देवळाणकर**
**शिक्षण संचालक ( उच्च शिक्षण )**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

Shri Borkar (A.P.)
18/10

श्री बोरकर

18/10

कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली